Manipal Cigna
Health Insurance




# अमर्याद संरक्षणासह वैयक्तिक योजना

*अटी आणि शर्ती लागू

तुमच्यासाठी तुमचे आरोग्य किती महत्त्वाचे आहे आणि त्यानुसार परिपूर्ण आरोग्य विम्याची किती गरज आहे हे आम्हाला माहित आहे. **मणिपाल सिग्ना सर्वाहने** तुम्हाला संरक्षण दिले आहे. **सर्वाह** सोबत प्रत्येक पावलावर आम्ही तुमच्या बाजूला उभे असल्यामुळे तुम्हाला सुरक्षित वाटू शकते.

**मणिपाल सिग्नासर्वाह उत्तम** ही अंतिम स्वरूपाची वैयक्तिक आणि सर्वसमावेशक आरोग्य विमा योजना आहे ज्याची संपूर्ण मानसिक शांती देण्यासाठी आखणी करण्यात आली आहे. या योजनेची अमर्याद शक्ती तुम्हाला उच्च वैद्यकीय खर्च आणि आरोग्यासंबंधी अनपेक्षित आव्हानांपासून संपूर्णपणे सुरक्षित ठेवण्याची काळजी घेते.




**सादर आहे सर्वानंद,** जो **मणिपाल सिग्ना सर्वाहचा** चेहरा आहे आणि तुमचा संपर्क **सर्वाह तज्ञाशी** येतो. आपल्या बुद्धिमत्तेने आणि गूढ आकर्षणाने, **सर्वानंद** द्वारा तुम्हाला तुमच्यासाठी आणि तुमच्या पियजनांसाठी सर्वोत्तम योजनांसंबंधी मार्गदर्शन केले जाते, आणि सुज्ञपणाने तुमचे काळजी घेतली जाते यावर तुम्ही विसंबून राहू शकता.

# **अनंत फायदे***,
# अनंत सेवा

अविरत संरक्षणामुळे निधी संपण्याची चिंता नाही. अनंत लाभांमुळे, ज्यासाठी तुमच्या बचतीवर आणि गुंतवणुकीवर कोणताही परिणाम न होता तुम्हाला पैशाची गरज असते असा हृदयविकार, कर्करोग, झटका किंवा अवयव/ बोन मॅरो प्रत्यारोपण,यामुळे तुम्हाला रुग्णालयात दाखल व्हावे लागल्यास मिळेल अमर्याद विमा रक्कम. आता आजारातून बरे होण्यावर लक्ष केंद्रित करा आणि वाढणाऱ्या मोठ्या वैद्यकीय बिलांवर नाही.






# खऱ्या अर्थाने
# तुमची **सारथी***

अनिश्चित परिस्थिती कधीही वाट पाहत नाही, मग तुम्ही का वाट पाहायची? तुम्हाला अस्थमा, मधुमेह,डिसलिपीडेमिया, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब यासारखे आजार असले तरीसुद्धा सारथीमुळे तुमचा प्रतिक्षा कालावधी नेहमीच्या 36 महिन्यांवरून 30 दिवस इतका कमी होतो.

# गुल्लक* लाभाचा आनंद घ्या


खात्रीशीर 10x पट बोनस सह तुमची गुल्लक शिल्लक दरवर्षी 100%ने वाढत जाते, त्यामुळे वाढत्या महागाईपासून तुम्ही सुरक्षित राहता आणि तिचे संरक्षण कधीही संपणार नाही याची काळजी घेतली जाते.

**समजा मूळ संरक्षण ₹10 लाख आहे.**




# पुनर्संचयनासह* विश्वास बाळगा

आव्हाने कधी थांबत नाहीत, आणि तुमचे संरक्षण सुद्धा थांबता कामा नये. एका पॉलिसी वर्षांत संबंधित असलेल्या आणि संबंधित नसलेल्या दोन्ही प्रकारच्या आजारांसाठी गरज असेल तितक्या वेळा तुमच्या संरक्षण पुनर्संचयित करा, त्यामुळे तुमची आणि तुमच्या कुटुंबाची अमर्याद काळजी घेतली जाते.



## **सरप्लस बेनिफिट*** द्वारे समाधानी रहा.

डबल सुरक्षा मिळवा. पहिल्या दिवसापासून, प्रत्येक पॉलिसी वर्षात, पहिल्या दाव्यासाठी तुमच्या विमा रकमेची 100% इतकी अतिरिक्त मिळवा, त्यामुळे तुम्ही सर्व गोष्टींसाठी सज्ज असता.



**तुमचे मूलभूत संरक्षण**

**सरप्लस बेनिफिट सह तुमचे मूलभूत संरक्षण***

## आमच्या **प्रसुती आणि नवजात बालक संरक्षणासह*** भविष्य सुरक्षित करा

प्रसुती आणि नवजात बालक संरक्षणासह, तुम्ही आणि तुमचा वाढता परिवार जीवनातील मौल्यवान क्षणी सुरक्षित आहात या जाणिवेने मानसिक शांती मिळवा आणि कोणतीही चिंता न करता या सुंदर जगात नवजात बालकाचे स्वागत करा.



वैयक्तिक
**अपघात संरक्षणाचे***
कवच मिळवा

अपघात केव्हाही, कोठेही होऊ शकतो. अपघात संरक्षणाद्वारे तुमच्या कुटुंबाचे रक्षण करा आणि ₹ 3 कोटी पर्यंत स्थिर लाभ संरक्षण मिळवा.







# शून्य झोनल को-पेसह

## चिंतामुक्त रहा

उपचारांसाठी पैसे भरा, ठिकाणासाठी नाही. कोणताही अधिक आर्थिक ताण न सोसावा लागता तुम्हाला हवे त्या कोणत्याही शहरात उपचार घ्या. कारण कोणत्याही भौगोलिक मर्यादेशिवाय तुमची काळजी घेतली गेली पाहिजे.




सदा सिक्युअर रहा!

## सर्वप्रथम सोबत तुमचा चिंतामुक्त पवास सुरू करण्यासाठी

QR कोड स्कॅन करा आणि myManipalCigna ॲप डाऊनलोड करा.

GET IT ON Google Play

Download on the App Store

## लाभ एका दृष्टीक्षेपात

| अनु.क्र. | तपशील | उत्तम |
|---|---|---|
| 1 | विमा रकमेचे पर्याय | ₹5 लाख/ ₹7.5 लाख/ ₹10 लाख/ ₹15 लाख/ ₹20 लाख/ ₹25 लाख/ ₹50 लाख/ ₹100 लाख/ ₹200 लाख/ ₹300 लाख |
| 2 | नात्यांना संरक्षण | **वैयक्तिक:** स्वतः, कायदेशीर विवाहित जोडीदार किंवा लिव्ह-इन जोडीदार, मुलगा, मुलगी, वडील/आई/ सासरा/ सासू/ सून/ जावई/ आजी आजोबा/ नातवंडे/ काका मामा/काकी मामी/भाचा/ भाची/ भाऊ/ बहीण/ वहिनी/ मेहुणा.<br>**फ्लोटर:** स्वतः, कायदेशीर विवाहित जोडीदार किंवा लिव्ह-इन पार्टनर, आश्रित मुले (नैसर्गिक/कायदेशीर दत्तक), अवलंबित पालक/ सासूसासरे. |
| 3 | पात्रता | प्रौढ - किमान वय 18 वर्ष, कमाल वय - मर्यादा नाही<br>**अवलंबित मुले** - किमान वय 91 दिवस, कमाल वय 30 वर्ष (फ्लोटर पद्धतीने) |
| 4 | पॉलिसीचा प्रकार | वैयक्तिक/ बहुवैयक्तिक आणि फॅमिली फ्लोटर (2 प्रौढ+3 मुले पर्यंत) |
| 5 | पॉलिसीचा कालावधी | 1, 2 व 3 वर्ष |
| 6 | नूतनीकरण योग्य | जीवनभर |
| **मूळ संरक्षण** | | |
| 7 | आंतररुग्ण हॉस्पिटलायझेशन | विमा रकमेपर्यंत संरक्षण<br>या लाभांमध्ये नमूद करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत खालील प्रमाणे संरक्षण देण्यात येईल.<br>a. वमा रकमेपर्यंत नमूद करण्यात आलेले आधुनिक आणि अत्याधुनिक उपचार समाविष्ट<br>b. विमा रकमेपर्यंत HIV/AIDS आणि STD समाविष्ट<br>c. विमा रकमेइतके मानसिक आजारासाठी संरक्षण |
| 8 | खोली निवास व्यवस्था | सिंगल प्रायव्हेट AC रूमपर्यंत संरक्षण<br>ICU साठी: विम्याच्या रकमेपर्यंत संरक्षण |
| 9 | दिवस सेवा उपचार | विमा रकमेपर्यंत सर्व दिवस सेवा पद्धती समाविष्ट |
| 10 | हॉस्पिटलायझेशनपूर्व वैद्यकीय खर्च | रुग्णालयात दाखल करण्याच्या 90 दिवस अगोदर पर्यंतचा वैद्यकीय खर्च; विमा रकमेपर्यंत समाविष्ट |
| 11 | हॉस्पिटलायझेशनच्या नंतरचा वैद्यकीय खर्च | रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यानंतर 180 दिवसांपर्यंतचा वैद्यकीय खर्च; विमा रकमेपर्यंत समाविष्ट |
| 12 | डोमिसिलरी हॉस्पिटलायझेशन | विमा रकमेपर्यंत समाविष्ट हॉस्पिटलायझेशन पूर्वीचा आणि नंतरचा प्रत्येकी 30 दिवसांचा खर्च |
| 13 | रस्ता रुग्णवाहिका | विमा रकमेपर्यंत संरक्षण |
| 14 | दान करणाऱ्या व्यक्तीचा खर्च | विमा रकमेपर्यंत समाविष्ट<br>• दान करणाऱ्या व्यक्तीचा रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीचा आणि नंतरचा खर्च (प्रत्येकी 30 दिवस पर्यंत)<br>• यशस्वी प्रत्यारोपणासाठी पॉलिसी वर्षातून एकदा दात्याच्या तपासणीसाठी लागणारा खर्च<br>• रुग्णालय दाखल केले असताना किंवा डिस्चार्ज दिल्यानंतर 30 दिवस पर्यंत गंभीर समस्या निर्माण झाल्यास - विमा रकमेच्या 25% पर्यंत, विमा रकमेहून अधिक जास्तीत जास्त ₹2 लाखच्या अधीन. |
| 15 | आयुष उपचार | विमा रकमेचे पुनर्संचयन |
| **मूल्यवर्धित संरक्षण** | | |
| 16 | टेले-कन्सल्टेशन | पॉलिसी वर्षात जनरल जनरल फिजिशियन सोबत अमर्यादित टेले-कन्सल्टेशन सल्ला |
| 17 | स्वास्थ्य लाभ | निरोगी जीवन व्यवस्थापन कार्यक्रम पूर्ण करा आणि मूळ प्रीमियमच्या 20% पर्यंत रिवार्ड्स मिळवा |
| 18 | नेटवर्क पुरवठादाराकडून सूट | फार्मसी, डायग्नोस्टिक, आणि मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडच्या नेटवर्क पुरवठादारांकडून दिल्या जाणाऱ्या हेल्थ सप्लीमेंट्स वर सूट |
| **वैकल्पिक संरक्षण** | | |
| 19 | वैयक्तिक अपघात संरक्षण^ | विमा रक्कम -₹10 लाख, ₹15 लाख, ₹20 लाख, ₹25 लाख, ₹30 लाख, ₹40 लाख, ₹50 लाख, ₹1 कोटी, ₹2 कोटी, ₹ कोटी<br>विमाधारक व्यक्ती सामान्य वाहनात भाडे भरून प्रवास करणारी व्यक्ती असल्यास अपघाती मृत्यू किंवा कायमस्वरूपी संपूर्ण अपंगत्व आल्यास निवडलेल्या विमा रकमेच्या 200% संरक्षण. |
| 20 | तात्पुरते संपूर्ण अपंगत्व (TTD) (कमावत्या सदस्यांसाठी उपलब्ध, फक्त वैयक्तिक अपघात संरक्षण घेतल्यास) | विमा रक्कम - ₹5 हजार, ₹10 हजार, ₹15 हजार, ₹20 हजार, ₹25 हजार, ₹50 हजार, ₹1 लाख दर आठवड्याला.<br>जर विमित व्यक्तीला पॉलिसीच्या कालावधीत अपघातामुळे काही ईजा झाली आणि सदरईजेमुळे विमित व्यक्तीला दुखापतीनंतर लगेच तात्पुरते संपूर्ण अपंगत्व आले, आम्ही TTDच्या कालावधी दरम्यान दर आठवड्याला स्थिर लाभाचे पैसे देऊ. TTD<br>**नोट:**<br>i. तात्पुरत्या संपूर्ण अपंगत्वाच्या प्रारंभाच्या तारखेपासून गणना केलेल्या कोणत्याही एका इजेच्या संदर्भात संरक्षणाच्या आठवड्यांची कमाल संख्या - 100. |
| 21 | आरोग्याची तपासणी (फक्त कॅशलेस पद्धतीने उपलब्ध) | वयाची 18 वर्षे पूर्ण केलेल्या सर्व प्रौढ विमाधारकांना प्रत्येक पॉलिसी वर्षात (पहिल्या वर्षासह) उपलब्ध.<br>• 5 लाख विमा रकमेसाठी: पॅकेज 1<br>• 7.5 लाख आणि 10 लाखविमा रकमेसाठी: पॅकेज 2<br>• 10 लाखपेक्षा अधिकविमा रकमेसाठी: पॅकेज 3 |
| 22 | हवाई रुग्णवाहिका | विमा रकमे इतके संरक्षण, हवाई रुग्णवाहिकेसाठी केलेल्या खर्चासाठी मूळ विमा रकमेहून अधिक जास्तीत जास्त ₹10 लाखाच्या अधीन. |
| 23 | विमा रकमेचे पुनर्संचयन (जेव्हादाव्यामुळेघेतलेली विमा रक्कम कमी पडते) | संबंधित नसलेल्या सर्व आजारांसाठी किंवा त्याच एका पॉलिसी वर्षात, मूळ विमा रकमेहून अधिक अनेक वेळा पुनर्संचयन करण्याची सुविधा उपलब्ध आहे.<br>1ल्या दाव्यासाठी पुनर्संचयन होणार नाही. |
| 24 | गुल्लक (खात्रीशीर संचयित बोनस) | मागील पॉलिसी वर्षात काही दावा केला असला तरी सुद्धा प्रत्येक पॉलिसी वर्षात विमा रकमेच्या जास्तीत जास्त 1000% पर्यंत, विमा रकमेत 100% खात्रीशीर वाढ. |
| 25 | प्रसूती आणि नवजात बालकाचा रुग्णालयातील खर्च | प्रसूती, नवजात बालकाचे उपचार आणि एक वर्षाचे लसीकरण, यासाठी विमा रकमेच्या 20% पर्यंत संरक्षण, जास्तीत जास्त ₹5 लाख पर्यंत संरक्षण. या लाभाच्या अंतर्गत संपूर्ण जीवनभर 2 (दोन) पर्यंत प्रसूतींचा समावेश आहे आणि वैद्यकीय दृष्टिकोनातून आवश्यक असलेल्या गर्भपाताचा समावेश आहे.<br>प्रौढ पुरुष विमित सदस्यासाठी वैयक्तिक पॉलिसी अंतर्गत देखील प्रसूतीचा खर्च समाविष्ट आहे आणि महिला जोडीदाराचा विमित सदस्य म्हणून समावेश केल्यानंतर दाव्याचे पैसे द्यायचे असतील. पॉलिसीच्या प्रस्थापनेच्या तारखेनुसार प्रतिक्षा कालावधी लागू असेल.<br>**टीप:**<br>i. या लाभाचा फायदा घेण्यापूर्वी प्रौढ महिला विमित व्यक्तीसाठी मूळ पॉलिसी आणि प्रस्तुती खर्च या अंतर्गत किमान 36 महिने संरक्षण घेतलेले असले पाहिजे. |

| | | |
|---|---|---|
| 26 | सारथी | पॉलिसीच्या प्रस्थापनेच्या वेळी घोषित करण्यात आलेल्या आणि स्वीकारण्यात आलेल्या अगोदर असलेला आजारांशी संबंधित रुग्णालयातील वास्तव्यासाठी पॉलिसीच्या प्रस्थापनेपासून 31व्या दिवसापासून संरक्षण उपलब्ध असेल, 36 महिन्यांचा PED प्रतिक्षा कालावधी लागून नसेल.<br>i. अस्थमा ii. मधुमेह iii. डिसलीपिडेमिया iv. लठ्ठपणा<br>v. उच्च रक्तदाब<br>टीप - फक्त पहिल्या पॉलिसी वर्षात हे वैकल्पिक संरक्षण उपलब्ध असेल आणि नूतनीकरणाच्या वेळी उपलब्ध होणार नाही.<br>एकदा घेतल्यास पुढील नूतनीकरणाच्या वेळी यातून बाहेर पडता येणार नाही. |
| 27 | रूमरेंट मध्ये सुधारणा | विविध व्यक्ती खालील प्रमाणे रूमच्या प्रकाराच्या गटाच्या पात्रतेत सुधारणा करू शकेल:<br>**पर्याय 1:** कोणतीही रूम<br>**पर्याय 2:** शेअरिंग AC रूम;<br>ICU विमा रकमेइतकी |
| 28 | अतिरिक्त लाभ | पत्येक पॉलिसी वर्षात, दिवस 1 पासून फक्त 1ल्या दाव्यासाठी अतिरिक्त 100% विम्याची रक्कम उपलब्ध. |
| 29 | अनंत | कर्करोग, हृदयविकार, झटका आणि प्रमुख अवयवांचे/ बोन मॅरोचे प्रत्यारोपण यासाठी आंतररुग्ण उपचार, दिवस सेवा उपचार किंवा आयुष उपचार यासाठी अमर्याद संरक्षण.<br>**टीप:**<br>i. हे वैकल्पिक संरक्षण, फक्त मूळ विमा रक्कम ₹10 लाख आणि अधिक साठी उपलब्ध आहे.<br>ii. हे वैकल्पिक संरक्षण फक्त पहिल्या पॉलिसी वर्षाच्या दरम्यान उपलब्ध आहे आणि नंतर नूतनीकरणाच्या वेळी घेता येणार नाही.<br>iii. एकदा घेतल्यानंतर, हे संरक्षण नंतर नूतनीकरणाच्या वेळी बंद करता येणार नाही. |
| 30 | वजावटीचा पर्याय | विमाधारक व्यक्तीला यापैकी कोणत्याही एकाची निवड करण्याचा पर्याय उपलब्ध आहे<br>**पर्याय 1:** ₹10 हजार, ₹25 हजार, ₹50 हजार, ₹1 लाख, ₹2 लाख, ₹3 लाख, ₹4 लाख, ₹5 लाख, ₹10 लाख इतकी एकूण वजावट<br>**पर्याय 2:** - सर्व स्वीकार्य दाव्यांवर प्रतिदिन हॉस्पिटलायझेशनसाठी ₹1 हजार, ₹2 हजार, ₹3 हजार, ₹4 हजार किंवा ₹5 हजार |
| 31 | स्वेच्छिक सह-भरणा | प्रत्येक दाव्यासाठी 10%, 20% किंवा 30% चा पर्याय लागू असेल |
| 32 | अ-वैद्यकीय वस्तू आणि टिकाऊ वैद्यकीय उपकरणे | 1. **अवैद्यकीय वस्तू**<br>आंतर-रुग्ण हॉस्पिटलायझेशन किंवा दिवस सेवा उपचार किंवा स्थानिक हॉस्पिटलायझेशनच्या बाबतीत, विम्याच्या रकमे इतकेअवैद्यकीय वस्तूं साठी संरक्षण.<br>2. **टिकाऊ वैद्यकीय उपकरणे**<br>हॉस्पिटलायझेशनच्या दरम्यान किंवा डिस्चार्जनंतर 30 दिवसांच्या आत लिहून दिल्यास₹. ₹1 लाख पर्यंत यादीतील टिकाऊ वैद्यकीय उपकरणांसाठी संरक्षण. |
| **डिस्काउंट**<br>**लाइफ़ टाइम डिस्काउंट** | | |
| 33 | लवकर नूतनीकरण केल्यास सूट<br>किंवा<br>स्थायी सूचनांसाठी सूट | लवकर नूतनीकरण केल्यास सूट - पॉलिसीची मुदत संपण्याच्या 30 दिवस अगोदर नूतनीकरण केल्यास तुम्हाला नूतनीकरणाच्या प्रीमियमवर 2.5% इतकीसूट मिळू शकेल.<br>किंवा<br>स्थायी सूचनांसाठी सूट - स्थायी सुचनाद्वारे नूतनीकरणाची प्रीमियम प्राप्त झाल्यास नूतनीकरणाच्या प्रीमियमवर 2.5% इतकीसूट मिळू शकेल.<br>**टीप** - लवकर नूतनीकरण केल्यास सूट आणि स्थायी सूचनांसाठी सूट या परस्पर अनन्य आहेत, या सवलतींपैकी फक्त एका वेळी फक्त एक सूट लागू केली जाऊ शकते. |
| 34 | दीर्घ मुदतीच्या पॉलिसीसाठी सूट | 2 वर्षांच्या पॉलिसीची निवड केल्यास 7.5% सूट आणि 3 वर्षांच्या पॉलिसीची निवड केल्यास 10%. ही सूट फक्त एकेरी प्रीमियम भरणा पद्धतीसाठी लागू आहे. |
| 35 | कुटुंबासाठी सूट | एका वैयक्तिक पॉलिसी अंतर्गत 2 सदस्यांचा बहु-वैयक्तिक पद्धतीने समावेश केल्यास प्रीमियमच्या रकमेवर 10% सूट लागू आहे. |
| 36 | वेबसाईट सूट | कोणत्याही मध्यस्थाशिवाय विमा कंपनीच्या वेबसाईटवरून थेट पॉलिसीची खरेदी केल्यास 5% सूट देण्यात येईल. |
| **अल्प मुदतीसाठी सूट** | | |
| 37 | 1ल्या पॉलिसी नूतनीकरणासाठी सूट | तुमच्या 1ल्या पॉलिसी नूतनीकरणाच्या प्रीमियमवर 5% सूट. |
| **टीप -**<br>(i) एका पॉलिसी वर जास्तीत जास्त सूट ही 40% पेक्षा अधिक असणार नाही. | | |

## प्रतिक्षा कालावधीत

- प्राथमिक प्रतिक्षा कालावधी **30 दिवस**
- नमूद केलेले आजार/ पद्धती प्रतिक्षा कालावधी **24 महिने**
- अगोदर असलेला प्रतिक्षा कालावधी **36 महिने**

**टीप -**

- ^वैयक्तिक अपघात संरक्षण - या पर्यायाअंतर्गत वैयक्तिक आणि कौटुंबिक पद्धतीने संरक्षण उपलब्ध आहे, प्रवेशाचे वेळी किमान वय - 5 वर्षे, प्रवेशाचे वेळीकमाल वय 65 वर्षे.
- संरक्षणपात्र नाती - स्वत:, कायदेशीररित्या विवाहित जोडीदार, अवलंबित मुले, अवलंबित आई वडील/सासू सासरे

**कौटुंबिक संरक्षणाच्या बाबतीत विमा रकमेची पात्रता**

| कमावता सदस्य | घेतलेल्या विमा रकमेनुसार |
|---|---|
| कमावती नसलेली जोडीदार/लिवइन जोडीदार | कमावणाऱ्या सदस्याच्या विम्याच्या रकमेच्या 60%. |
| अवलंबित मुले/आईवडील/सासूसासरे | विम्याच्या रकमेच्या 30%, जास्तीत जास्त ₹30 लाखपर्यंत |

| वयानुसार | विमा रकमेची पात्रता ही प्रस्तावकर्त्याच्या किंवा विमा काढण्यात येणाऱ्या कमावत्या सदस्याच्या वार्षिक मिळकतीच्या कमाल पटीइतकी असेल. (खाली नमूद केल्याप्रमाणे) |
|---|---|
| 18-45 | लाभदायक वार्षिक उत्पन्नाच्या जास्तीत जास्त 20 पट |
| 46- 60 | |
| >60 पेक्षा अधिक | लाभदायक वार्षिक उत्पन्नाच्या जास्तीत जास्त 10 पट |

अधिक माहितीसाठी स्कॅन करा




*अतिरिक्त प्रीमियम भरल्यास वैकल्पिक संरक्षण (तुमच्या योजनेनुसार)

अस्वीकार: मनिपाल सिग्ना हेल्थ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (पूर्वीची सिग्ना TTK हेल्थ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड) | CIN: U66000MH2012PLC227948 | IRDAI नोंदणी क्र.151, नोंदणीकृत कार्यालय: 401/402, 4था मजला, रहेजा टायटॅनियम, पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळ, गोरेगाव पूर्व, मुंबई - 400063. | विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी जोखमीचे घटक, नियम व अटी, या संबंधी माहितीसाठी कृपया विक्रीची माहितीपुस्तिका/तुमच्या वेबसाईटवर (डाऊनलोड भागात) उपलब्ध असलेले विक्रीचे दस्तऐवज वाचा. | ट्रेडनेम/ट्रेड लोगो हे MEMG इंटरनॅशनल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि सिग्ना इंटलेक्चुअल पॉपर्टी इन्. यांच्या मालकीचे आहेत. आणि मनिपाल सिग्ना हेल्थ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड द्वारा त्यांचा परवान्याअंतर्गत उपयोग करण्यात येत आहे. | मनिपाल सिग्ना सर्वाह UIN: MCIHLIP25035V012425 | टोल फ्री: 1800-102-4462 | वेबसाईट: www.manipalcigna.com | ARN: ADV/1550/Aug/2024-25.